# 'श्वेत अंगार'

बळीराजा म्हणजे भारताचा अन्नदाता. इतर अनेक क्षेत्रांत आपला देश अग्रेसर असला तरी 'शेतीप्रधान देश' म्हणूनच तो ओळखला जातो. प्रत्यक्षात मात्र या शेतकऱ्यांची अवस्था खूपच वाईट आहे. विदर्भातल्या अनेक शेतकऱ्यांना तर आत्महत्येचाच मार्ग पत्करावा लागला. कापूस उत्पादक शेतकऱ्यांची अवस्थाही काही वेगळी नाही. त्यांची ससेहोलपट दाखवणाऱ्या 'श्वेत अंगार' या शॉर्ट फिल्ममधून अभिनेता नंदू माधव यांनी त्यांच्या हालअपेष्टांना वाचा फोडली आहे. शेतकऱ्यांच्या समस्या आणि आर्थिक कोंडीमुळे निर्माण होणारे प्रश्न यांच्यावर प्रकाश टाकणाऱ्या २५ मिनिटांच्या या फिल्मचा प्रीमिअर ९ मे रोजी होत आहे.

आविष्कार केंद्राच्या 'सिनेस्कूप' उपक्रमांतर्गत ९ मे रोजी संध्याकाळी साडेसात वाजता माहीम म्युनिसिपल शाळेत या फिल्मचा प्रीमिअर होणार आहे. 'सिनेस्कूप'ची सुरुवात 'पी' या अमुधान यांच्या माहितीपटाने आजपासून होत आहे. त्यानंतर अमर कन्वर यांची 'नाइट ऑफ प्रॉफ्ली' ही डॉक्युमेण्टरी दाखवली जाणार आहे.



दुसऱ्या दिवशी गुरुविंदर सिंग यांचा 'लेग्स अबाव्ह माय फीट' आणि 'श्वेत अंगार' दाखवले जाणार आहेत. 'श्वेत अंगार'चं लेखन राजकुमार तांगडे यांनी केलं आहे. तर मिलिंद शिंदे, वीणा जामकर, रमेश मेढेकर यांनी भूमिका केल्या आहेत. या फिल्मची निर्मिती 'इंडियन मॅजिक आय प्रा. लि.'ने केली आहे.

– मुंबई टाइम्स टीम

---



**महत्त्वाचे**



## शॉर्ट फिल्मच्या 'श्वेत अंगार'चा आज प्रिमिअर

निसर्गाचा असमतोल, नापिकी, कर्जबाजारीपणा यामुळे महाराष्ट्रात घडणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एक सामाजिक प्रश्न बनू पाहतोय. राज्यकर्त्यांनी त्यांच्यासाठी कितीही पॅकेजेसच्या घोषणा केल्या तरी या प्रश्नाची दाहकता आणि भीषणता त्यांना कळलेली नाही हे वास्तव आहे. भीषण सामाजिक वास्तव असलेल्या या प्रश्नाची दाहकता समाजापर्यंत पोहोचावी, सर्वसामान्यांना शेतकऱ्यांच्या व्यथांना वाचा फोडण्यासाठी इंडियन मॅजिक आय प्रा. लि.ने श्वेत अंगार या शॉर्ट फिल्मची निर्मिती केली असून, दिग्दर्शन नंदू माधव यांनी केले आहे. आर्थिक ओढाताणीबरोबरच शेतकऱ्यांच्या समस्यावर नंदू माधव यांनी या फिल्ममधून प्रकाशझोत टाकला आहे. ही फिल्म २५ मिनिटांची असून, त्यांचे चित्रिकरण जालना जिल्ह्यात करण्यात आले. राजकुमार तांगडे यांनी फिल्मचे लेखन केले आहे. अभिनेता मिलिंद शिंदे, वीणा जामकर, रमेश मेढेकर याच्या या फिल्ममध्ये भूमिका आहेत. अविष्कार केंद्राच्या सिनेस्कूप उपक्रमांतर्गत आज या फिल्मचा प्रिमिअर माहीम येथील म्युनिसिपल शाळेत सायंकाळी ७.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

---

## नंदू माधव यांच्या लघुपटाचा प्रीमिअर

सिने-नाट्य अभिनेते नंदू माधव यांनी 'श्वेत अंगार' नामक एक लघुपट दिग्दर्शित केला आहे. त्याचा प्रीमिअर ९ मे रोजी आविष्कार सांस्कृतिक केंद्राच्या 'सिनेस्कूप' या उपक्रमाअंतर्गत होणार आहे.

माहीम येथील मियाँ मोहम्मद छोटानी मार्ग येथील न्यू म्युनिसिपल हायस्कूल येथे हा उपक्रम होतो. या महिन्याच्या 'सिनेस्कूप'ची सुरुवात ८ मे रोजी रात्री ७.३० वाजता अमुधान दिग्दर्शित 'पी' या माहितीपटाने होईल. त्यानंतर अमर कन्वर यांचा 'नाईट ऑफ प्रॉक्सी' हा माहितीपट, तर ९ मे रोजी 'लेग्स अबॉव माय फीट' (गुरुविंदर सिंह) आणि 'श्वेत अंगार' दाखविण्यात येईल. संपर्क : २४४४५८७१.

## कान महोत्सवात 'श्वेत अंगार'

जगभरातल्या फिल्म इंडस्ट्रीचे डोळे सध्या कान महोत्सवाकडे लागले आहेत. या महोत्सवाचा शानदार उद्घाटन सोहळा, दिग्गज निर्माते, दिग्दर्शक व कलाकारांच्या उपस्थित होणारे चित्रपटांच प्रदर्शन याकडे चित्रपटप्रेमींचं लक्ष लागलेलं असतं. यावेळी अभिनेते नंदू माधव यांनी दिग्दर्शित केलेली 'श्वेत अंगार' ही शॉर्ट फिल्म कान महोत्सवात दाखवली जाणार आहे. कान महोत्सवात भारतातून जाणाऱ्या १७ शॉर्ट फिल्म्समध्ये 'श्वेत अंगार' एकमेव मराठी शॉर्ट फिल्म आहे.

इंडियन मॅजिक आय प्रा. लि.ने निर्माण केलेल्या 'श्वेत अंगार'चा विषय कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा असून मिलिंद शिंदे, रमेश मेढेकर, वीणा जामकर यांच्या प्रमुख भूमिका यात आहेत. फिल्मचं लेखन राजकुमार तांगडे यांनी केलं असून २ मे रोजी अविष्कार केंद्राच्या 'सिनेस्कूप' उपक्रमांतर्गत 'श्वेत अंगार'चा प्रीमिअर झाला होता.



## नंदू माधव दिग्दर्शित 'श्वेत अंगार' कान महोत्सवात

अभिनेता नंदू माधव यांनी दिग्दर्शित केलेला 'श्वेत अंगार' हा कान महोत्सवात दाखविला जात असलेला या वर्षीचा एकमेव मराठी लघुपट आहे. एकूण १७ लघुपट या महोत्सवात भारतातर्फे प्रदर्शित होत आहेत.

विदर्भातील गरीब कापूस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती, त्यांचे जगणे, त्यांचा संघर्ष आणि कापसाच्या पिकाची स्थिती याचे परिणामकारक



चित्रण या लघुपटात आहे. राजकुमार तांगडी यांनी चित्रपटाचे लेखन केले असून त्यात मिलिंद शिंदे, रमेश मेढेकर, सुनील तंगडे यांच्या भूमिका आहेत. पार्श्वसंगीत नरेंद्र भिडे यांचे आहे. ■

# कान फेस्टिवलमध्ये मराठीचा सन्मान

● अपर्णा पाटील

'इंडियन मॅजिक आय'चा 'श्वेत अंगार' हा मराठी लघुपट कानमध्ये झळकला. मराठी माणसासाठी हा मोठाच सन्मान. ज्या महोत्सवामध्ये मायकल मूरसारखा दिग्दर्शक आपल्या डॉक्युमेण्टरीचा प्रीमिअर करतो, तिथे मराठी लघुपटाला मान मिळतो हे विशेष.

राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत असताना एका कर्जात बुडालेल्या शेतकऱ्याच्या जिद्दीची कहाणी या लघुपटाचा विषय आहे. पण कुठेही शेतकऱ्यांच्या दुःखाचे प्रसंग नाहीत की भाषणबाजी नाही. केवळ दृश्यातून सारं काही मांडण्यात आलं आहे. त्यामुळे कॅमेरामन म्हणून दीपक अंजारिया यांच्यावर मोठी जबाबदारी होती. जालन्याजवळच्या परतूर या गावात शूटिंग झालं.



उन्हाचा कडाका तिथे भलताच. कथानक साधं. हा लघुपट साकारताना कॅमेरा ओव्हरपॉवरिंग ठरणार नाही, हे लक्षात घेतलं होतं. त्यामुळे शूटिंगपूर्वी दिग्दर्शक नंदू माधव आणि 'इंडियन मॅजिक आय'चे श्रीरंग गोडबोले यांच्याशी बोलणंही झालं. मात्र कथाचं तशी असल्याने कडकडीत उन्हात चित्रण आवश्यक होतं. कथेला न्याय देण्यासाठी अगदी अनबेअरेबल असल्याने परिस्थितीच शूटिंग पार पाडलं, असं अंजारिया म्हणाले.

श्रीरंग गोडबोले म्हणाले, की आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी वाचतो. पण कलाकार म्हणून प्रतिक्रिया व्यक्त करत नाही, असा विचार नेहमीच माझ्या मनात येतो. त्यामुळेच या लघुपट करण्याचं ठरवलं. यामधून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली असं म्हणायचं नाही. पण त्याची दखल मात्र घेतली आहे. चित्रणासाठी खूप मेहनत 'श्वेत अंगार'च्या टीमने घेतली आहे. रणरणत्या उन्हात जिथे प्यायला पाणी मिळत नाही, असं वास्तव या टीमने अनुभवलं.

कानला लघुपट पाठवणं कठीण नाही. मात्र तिथे आपली फिल्म कशी पाठवायची हे इथल्या अनेकांना माहिती नसतं. हा लघुपट कानमध्ये दाखवल्याने तर त्याची सामान्य पातळीवर मोठ्या प्रमाणावर दखल घेतली जाईल, असं वाटत नाही. मात्र विविध फेस्टिवल्समध्ये आम्ही आता या लघुपटाचं स्क्रीनिंग करायचं ठरवलंय. पंचवीस मिनिटांच्या लघुपटाचं पुण्यात, मुंबईत स्क्रीनिंग करण्याचा मानस असल्याचंही श्रीरंग गोडबोले यांनी सांगितलं.

आविष्कार सांस्कृतिक केंद्रातही हा लघुपट दाखवण्यात आला होता. त्या वेळी दिग्दर्शक नंदू माधव, श्रीरंग गोडबोले आणि शफाअत खान यांनी या वेळी प्रेक्षकांशी संवादही साधला होता. त्याच वेळी हा अनुभव सुन्न करणारा आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

aparna.patil@timesgroup.com

---

**Shwet Angaar** Nandu Madhav rewrites the myth of Sisyphus and replaces a stone with a bale of cotton. This is the cotton that the farmer must sell to feed his family. He sets out to the market to sell his bale, but the white fluff proves to be a bigger burden than imagined. *(NR) 25 mins.*
*New Mahim Municipal School, Teesri Galli, Mahim (W)(2244-45871). Train Mahim (WR & CR Harbour). Bus Mahim station.*